महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. : औसंवि/ब/ककनिस/६०वी बैठक/ ६३७४

दिनांक : ०४/०३/२०१६

# परिपत्रक

**विषय:** म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ६० व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

******

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ६० वी बैठक दि. १३/०१/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता, हाँगकाँग बँक इमारत, फोर्ट, मुंबई येथे घेण्यात येवून सदरहू बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१. म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी अंतर्गत तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित ०५ सदस्यीय कुटुंबियांसाठी MSEB HCL Group Mediclaim Pollicy सुरु करण्यात आलेली आहे. सबब, म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना वैद्यकीय उपचारासाठी द्यावयाच्या आर्थिक मदती संदर्भातील नियमांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

अ) कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना मेडिक्लेम योजनेमधून ज्या आजारांकरिता वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देय नाही, फक्त अशाच आजारांसाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाकरिता यापुढे म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत मंजूर करण्यात येईल.

ब) तसेच कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास वैद्यकीय उपचारासाठी रु. तीन लाखांपर्यंत अथवा रु.तीन लाखांपेक्षा जास्त रक्कम खर्च झालेली आहे, अशा अवलंबितांना मेडिक्लेम योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून झालेल्या वैद्यकीय खर्चाची Cashless अथवा Non Cashless स्वरुपामध्ये रु. तीन लाख मर्यादेपर्यंत प्रतिपूर्ती मिळालेली असल्याने म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधीतून याकरिता आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

क) मेडीक्लेम योजनेच्या माध्यमातून अतिशय कमी दरामध्ये Top -Up सुविधा देखील कर्मचाऱ्यांकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्याने वरील अ- मध्ये नमूद केलेल्या आजारां व्यतिरिक्त इतर आजारांकरिता झालेल्या वैद्यकीय उपचारासाठीच्या खर्चाकरिता विशेष बाब म्हणून देखील आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२. कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीतून शिष्यवृत्ती मिळण्याकरीता प्रपत्र- 'अ' चा अर्ज सादर करणे गरजेचे आहे. मात्र, सांघिक कार्यालयाच्या परिपत्रकामध्ये मंजूर केलेल्या कालमर्यादेनंतर कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांचा शिष्यवृत्ती मंजूर करण्याकरिता विचार न करता असे अर्ज दफ्तरी दाखल करण्यात यावे.

३. सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२.११.२०११ मधील मुद्दा क्र. १४ तरेच मुद्दा क्र. १६ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीमध्ये खालील प्रमाणे फेरबदल करण्यात आले आहेत.

- मुद्दा क्र. १४ मध्ये फेरबदल करुन सांघिक खेळात सुध्दा प्राविण्य संपादन करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय किंवा तृतीय क्रमांक प्राप्त केल्यास रोख पारितोषिक देण्यात यावे.

- तसेच मुद्दा क्र. १६ मध्ये, फेरबदल करुन अपंग, प्रौढाच्या सांघिक खेळात सुध्दा प्राविण्य संपादन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोख पारितोषिक देण्यात यावे.

४. महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, विद्युत सहाय्यक, उपकेंद्र सहाय्यक व वीज सेवक यांच्या मानधनातून म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीची मासिक वर्गणी कपात होत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना म.रा.वि.मं. क.क.निधी समितीच्या कुठल्याही योजनेतंर्गत आर्थिक मदत / रोख पारितोषिक इ. आर्थिक लाभ देण्यात येत नाही. सबब, महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, विद्युत सहाय्यक, उपकेंद्र सहाय्यक, व वीज सेवक यांच्या मानधनातुन म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीची मासिक वर्गणी रु. १०/- ची कपात माहे फेब्रुवारी २०१६ पासून त्यांच्या मानधनातून करण्यात यावी. या अनुषंगाने, प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३१ दि २२/०२/२०१६ प्रसारित करण्यात आलेले आहे.

५. म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधीमधून द्यावयाची आर्थिक मदत / विविध योजना इ. करिता करावयाच्या खर्चासाठीच्या वार्षिक रु. १.५० कोटीच्या मर्यादेमध्ये वाढ करण्यात येवून सदर वाढ वार्षिक रु. २.५० कोटी करण्यात येत आहे.

६. सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र ३२८८६, दि. ०२.११.२०११ मधील अनु. क्र. ०४ नुसार मुलगी जन्मल्यानंतर (फक्त दोन पाल्यांकरिता) कर्मचाऱ्यास प्रोत्साहनपर रु. पाच हजार रक्कमेचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र भेट म्हणून देण्यात येते. याकरिताचा प्रस्ताव मुलगी जन्मल्याच्या तारखेपासून ०१ वर्षाच्या कालमर्यादेत प्राप्तझाल्यास मंजूरी देण्यात येईल.

७. सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र ३२८८६, दि. ०२.११.२०११ मधील अनु. क्र. ०३ रद्द करण्यात येत असून सदर परिपत्रकातील अनु क्र. १९ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

- "IAS / IPS / MPSC / UPSC या परिक्षांच्या पुर्वतयारीसाठी केंद्र / राज्य शासन मान्य संस्थेत प्रशिक्षणासाठी ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची निवड झाली असेल त्यांना रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी."

वरील सर्व निर्णयांची अंमलबजावणी दि. ०१.०३.२०१६ पासून करण्यात येईल.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या RAPDRP-Infoportal-(Circular-I.R.Dept.) येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(संजय ढोके)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

प्रत सविनय सादर :
१. संचालक (वित्त), म.रा.वि.मं सुत्रधारी कं.मर्या., हॉंगकॉंग बँक इमारत, फोर्ट, मुंबई.
२. कार्यकारी संचालक (मासं), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

प्रत सस्नेह सादर :
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.